# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन
# पंचायत समिती निलंगा

ई-टपाल जा.क्र.        /पंसनि/कार्या-  /काबि-                                                दि. 23/04/2025

प्रति,

**मा. ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत सर्व ता.निलंगा**

**विषय- स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा-2 अंतर्गत "कंपोस्ट खडडा भरू,आपला गाव स्वछ ठेवू" या अभियानाची अंमलबजावणी करणे बाबत.**

संदर्भ :- मा.प्रकल्प संचालक (जजमि),जि.प.लातूर यांचे ई-टपाल जाक्र  /2025/जिपला/जिपास्वामि/कार्या-04/काबि- दि.23/04/2025

**स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा-2 कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागात घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.गावाची संपुर्ण स्वच्छता करण्या बरोबर ग्रामीण भागातील गावांना दृष्यमान स्वच्छतेचा अपेक्षित दर्जा मिळवून देणे.** ग्रामीण जनतेचे स्वच्छतेविषयक वर्तणूकीत बदल घडवून आणणे, सेंद्रिय कच-याचे व्यवस्थापन करून वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच शाश्वत सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे,घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा व पर्यावरणपुरक योजना करण्यासाठी, कचरा कमी करणे,पुनर्वापर करण्याच्या उददेशाने **दिनांक 01 मे 2025 ते 30 सप्टेंबर 2025** या कालावाधीत **"कंपोस्ट खडडा भरू,आपल गाव स्वचछ ठेवू"** हे अभियान राबविण्याच्या सूचना प्राप्त आहेत.

**अभियानाचा कालावधी : दि.01 मे 2025 ते 30 सप्टेंबर 2025**

**अभियानाची सूचना व पुर्व तयारी:**

**1.अभियानाबाबत ग्रामपंचायत अधिकारी यांनी गावात ग्रामस्थांची बैठक घेउन अभियानबददल माहिती दयावी.**

**2.अभियानाच्या प्रसिदधीसाठी गावात दवंडी देणे ग्रामपंचायत,शाळा,अंगणवाडी,प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्रे,सोसायटी कार्यालय, तलाठी सज्जा,आदी ठिकाणच्या सूचना फलकावर व समाज माध्यमावर (फेसबुक,इन्सस्टाग्राम,युटयुब) दि.25.04.2025 पुर्वी अभियानाची माहिती प्रसारीत करावी.**

**3.**दिनांक 01 मे 2025 रोजी अभियानाच्या शुभारंभाकरीता ग्रामपंचायत स्तरावर उपस्थित राहणेकरीता गावस्तरावरील सर्व शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना सुचना दयाव्यात.

4.घरगुती व सार्वजनिक स्तरावर वर्गीकरण केलेल्या ओल्या व सुक्या कचर-याचे दिनांक 27/04/2025 ते 30/04/2025 रोजी संकलन करावे.

5.महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून "कंपोस्ट खडडा भरू,आपल गाव स्वच्छ ठेवू "वाटचाल दृश्यमान शाश्वत स्वच्छतेकडे या मोहिमेचा शुभारंभ दि.01 मे 2025 ला करावा.

6.दि.01 मे ते 10 मे 2025 पर्यंत गावातील ओला कचरा जमा करून नाडेप मध्ये भरणेत यावा.

**नाडेप खत खडडा भरण्याची पदधती:- घन**कचरा व्यवस्थापनांतर्गत गावस्तरावर बांधण्यात आलेले नाडेप पुढील पध्दतीमध्ये भरण्यात यावेत.यासाठी ओला कचरा, शेण,मातीचा वापर करावा.एका नाडेपमध्ये जैविक कचरा 1400ते 1600किले, शेण100 ते 120 किलो(8ते10टोपली),बारीक चाळलेली माती,1600ते 1800किलो,पाणी 1500ते 2000 लिटरअसे प्रमाण वापरण्यात यावे.

**पहिला थर:-** नाडेप भरतांना ओल्या कच-याच्या 3 ते 4 इंच जाडीचा थर टाकावा.

**दुसरा थर:- 2 इच शेणाचा थर**

**तिसरा थर:- 2 इंच जाडीचा ओल्या मातीचा थर टाकावा.**

एका नाडेपमध्ये पाच ते सात थर टाकावेत .सर्व थर टाकून झाल्यावर 1.5 फूट उंचीचा शेणाच्या घटट मिश्रणाचा डोम तयार करण्यात यावा.ख तयार होण्याच्या प्रक्रियेत 20 ते 30 दिवसात डोम दबला असल्यास पुन्हा कचरा शेण व मातीचा थर देण्यात यवा.

दि.01 सप्टेंबर 2025 ते 15 सप्टेंबर 2025 य कालावधीत नाडेपमधील खताचा उपसा करावा.यामध्ये 2.5 ते 3.00 टन खत तयार होते.सदर नाडेपचा खत तयार करण्यासाठी पुनर्प्रक्रियेसाठी वापर करावा.

**<u>नाडेप खत खडडयाची पडताळणी</u>**

ग्रामपंचायत अधिकारी यांनी गावातील खतखडडयाची पडताळणी करावी.

ACE Scanner

**प्रचार व प्रसिध्दी:**
अभियानाच्या यशस्वीतेसाठी गावाची यशोगाथा तयार करून इतर गावांना प्रेरित करावे.

**समुदाय परिणाम :**
1 नाडेप कंपोस्टिंगचा मोठ्या प्रमाणावर स्विकार होईल.
2 घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी, कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे, ज्यामुळे पर्यावरणावर होणार नकारात्मक परिणाम कमी होइल.
3 ग्रामपंचायत,बचतगट व युवकांचा सक्रिय सहभाग वाढवता येईल.

वरील प्रमाणे प्रत्येक नियोजनानुसार ग्रामपंचायत अंतर्गत प्रत्येक गावात दिनांक 01 मे ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीत "कंपोस्ट खड्डा भरू, आपले गाव स्वच्छ ठेवू " या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात यावी.या अभियानाचा फोटोसह अहवाल व यशोगाथा पंचायत समिती स्तरावर सादर करावा.

**गट विकास अधिकारी वर्ग-1**
**पंचायत समिती, निलंगा**

**प्रतिलीपी**

मा.प्रकल्प संचालक (ज.ज.मि.),जि.प.लातूर यांना माहितीस्व सविनय सादर

**गट विकास अधिकारी वर्ग-1**
**पंचायत समिती, निलंगा**

PDF Scanner ACE Scanner